




## महात्मा गांधी महाविद्यालय ग्रंथालय विभागाद्वारा डॉ एस. आर. रंगनाथन यांच्या ५१ व्या स्मृती दिनानिमित्य आदरांजली !

### डॉ एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालय विकासात ऐतिहासिक योगदान - उपप्राचार्य डॉ चंद्रकांत डोर्लीकर

एकेकाळी ग्रंथालय क्षेत्रात व माहितीच्या विस्फोटामुळे लाखो साहित्याची निर्मिती झाली, लाखो पुस्तकांचे आवक-जावक आणि त्यांचे सुरक्षितपणे नियोजन कसे करावे हा संपूर्ण भारतीय ग्रंथालय क्षेत्राकरीता चिंतेचा विषय होता. डॉ एस. आर. रंगनाथन यांनी त्यांना आलेल्या अनुभवाच्या आधारे या क्षेत्रात भरीव योगदान देऊन ग्रंथालयाचे आधुनिकीकरण आणि व्यवस्थापनाच्या नव्या संकल्पना निर्माण करून त्या कार्यान्वित करण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ एस. आर. रंगनाथन यांनी केले. वाचनसंस्कृती जनसामान्यात रुजविणाऱ्या या महापुरुषाला त्याच्या स्मृतिदिनानिमित्त मी मनापासून आदरांजली अर्पित करतो असे प्रतिपादन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ चंद्रकांत डोर्लीकर यांनी केले.

स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी येथे मा. प्राचार्य डॉ लालसिंग खालसा याच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय विभागाद्वारा डॉ एस. आर. रंगनाथन यांच्या ५१ व्या स्मृती दिन कार्यक्रम ग्रंथालयाच्या वाचन कक्षात घेण्यात आला. यावेळी मंचावर IQAC समन्वयक डॉ सतीश कोला, ग्रंथालय विभाग प्रमुख तथा ज्ञानस्रोत समिती समन्वयक डॉ किशोर वासुर्के, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ रमेश ठोंबरे, ज्ञानस्रोत समिती सदस्य डॉ नोमेश मेश्राम, डॉ विजय रैवतकर विद्यार्थी प्रतिनिधी कु. खुशबू कुमरे, श्री विकास चावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन ज्ञानस्रोत समिती विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. खुशबू कुमरे तर आभार ज्ञानस्रोत समिती विद्यार्थी प्रतिनिधी श्री विकास चावर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.